जा. क्र. प्रा/प्राशि/याप्राशा/मान्यता/मोआर
शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग,
पुणे-१. यांचे कार्यालय.
दिनांक :- २.३.९६.
27 MAR 1996

प्रति,
अध्यक्ष,
नवनगर शिक्षण मंडळ, श्रीकृष्णनगर, आकुर्डी, पुणे २५

**विषय :-** सन १९९५-९६ या शैक्षणिक वर्षात आणखी प्राथमिक शाळांना परवानगी देणे बाबत.

संदर्भ :- १] शासन शालेय शिक्षण विभागाकडील क्र. एहीएलएस-१०९५/४९२/ प्राशि-३, दिनांक १३.११.९५.
२] शासन पत्र क्र. एहोएलएस-१०९५[२३९]प्राशि-३, दि. १८.१.९६.
३] क्र. एहोएलएस-२०९५/२३९/प्राशि-३, दिनांक ३.२.९५.

वरील विषयाचे संदर्भाधीन शासनाकडील संदर्भाधीन पत्रान्वये आपल्या संस्थे मार्फत चालविण्यात येणाऱ्या सिद्धूनगर, निगडी, पुणे या आणखीवरील प्राथमिक शाळेस मराठी/अन्य माध्यमातून सन १९९५-९६ या शैक्षणिक वर्षी परवानगी देण्याचे प्रस्तावित केलेले आहे. मात्र ही परवानगी शासनाने खालील अटींची पूर्तता संस्थेकडून होत असल्यास देण्याचे प्रस्तावित केले आहे. तरी खालील अटींची पूर्तता संस्थेकडून होते किंवा कसे याबाबतचा अहवाल आपल्या जिल्ह्याचे शिक्षणाधिकारी [प्राथमिक], जिल्हा परिषद, प्रशासन अधिकारी, नगरपालिका शिक्षण मंडळ यांचेकडे विनाविलंब सादर करून त्याची एक प्रत या कार्यालयाकडे परस्पर सादर करावी. म्हणजे परवानगी देणे बाबतची पुढील कार्यवाही या कार्यालयास सादर करता येईल.

१] संबधित संस्था, संस्था नोंदणी अधिनियम १८६० व मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० प्रमाणे नोंदणीकृत असावी किंवा केवळ मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० प्रमाणे नोंदणीकृत करावी.
२] संस्थेविरुद्ध गंभीर स्वरूपाच्या तक्रारी नाहीत.
३] सदर संस्थेने चालविलेल्या अन्य प्राथमिक/माध्य. शाळांपैकी एखाद्या शाळेची मान्यता काढून घेतलेली नाही.
४] संबंधीत संस्थेत कोणत्याही प्रकारचे गैरव्यवहार चालत असल्याबाबतच्या तक्रारी आलेल्या नाहीत. अथवा संस्थेने चालविलेल्या शाळा शासनाने ताब्यात घेण्याबाबतचे एखादे प्रकरण प्रलंबित नाही.

मुख्याध्यापक
श्री. शिवछत्रपती प्राथमिक विद्यामंदिर
मोरेवस्ती, चिखली, पुणे ४११०६२.

२

५] संस्थेची आर्थिक स्थिती पुरेशी समाधानकारक आहे.

६] संस्थेने विहित नमुन्यात सुधारित शुल्कासह अर्ज केला आहे.

७] शासनाची मंजुरी नसताना प्राथमिक शाळा चालू ठेवण्यात आल्या प्रत्येक शैक्षणिक वर्षासाठी रु. १००/- दंड संस्थेने कोषागारात भरला आहे.

८] संस्था यथानियम शासन मान्यतेसाठी कागदपत्रांची पूर्तता तीन महिन्यात पूर्ण करेल.

९] संस्थेने शाळेमध्ये शासनाच्या विहित [illegible] शुल्क आकारणी आवश्यक आहे.

१०] शाळेमध्ये प्रत्यक्ष सुरु असलेले वर्ग व त्यातील विद्यार्थी संख्या कळवावी.

११] सक्षम अधिकाऱ्यांच्या मान्यतेशिवाय मान्य तुकडी संख्येपेक्षा जादा तुकड्या संस्था उघडणार नाही असे संस्थेने रु. १०/- च्या स्टॅम्प पेपरवर लेखी हमीपत्र देणे आवश्यक आहे.

१२] शासनाने ज्या माध्यमातून शाळा चालविण्यास परवानगी देण्यात येणार आहे ते माध्यम बदलून अन्य माध्यमाच्या तुकड्या संस्था/शाळा उघडणार नाही याची हमी रु. १०/- च्या स्टॅम्प पेपरवर द्यावी.

१३] सन १९९५-९६ मध्ये प्रत्यक्ष शाळा सुरु करण्यात आलेली नसेल तर पुढील शाळेच्या नूतनीकरणाबाबत संस्थेच्या ठरावासह तसेच शाळा यावर्षी का सुरु करण्यात आली नाही याच्या खुलाशासह या कार्यालयाकडे पाठवावा.

वरील अटींची पूर्तता होत असले बाबतची माहिती सर्व कागदपत्रांसह शिक्षणाधिकारी [प्राथमिक], जिल्हा परिषद, प्रशासन अधिकारी, नगरपालिका शिक्षण मंडळ यांचेकडे त्वरित सादर करावी; म्हणजे पुढील कार्यवाही त्वरित करता येईल.

O.C. signed by Dy D.E.

शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग, पुणे-१.

प्रत :-

१] शिक्षणाधिकारी [प्राथमिक],
जिल्हा परिषद, पुणे विभाग.

२] प्रशासन अधिकारी,
नगरपालिका शिक्षण मंडळ, पुणे विभाग.
यांचेकडे माहितीसाठी व पुढील कार्यवाहीसाठी रवाना.

मुख्याध्यापक
श्री. शिवछत्रपती प्राथमिक विद्यामंदिर
मोरेवस्ती, चिखली, पुणे ४११०६२.